मिरा-भाईंदर महानगरपालिका
माहिती व जनसंपर्क विभाग
प्रसिद्धीपत्रक

## ❖ "हर घर तिरंगा" उपक्रमांतर्गत उत्साही बाईक रॅली!

भारताच्या स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा करण्यासाठी केंद्र शासनाच्या पुढाकाराने "हर घर तिरंगा" ही मोहीम २०२२ पासून देशभरात राबवली जात आहे. या मोहिमेचा मुख्य उद्देश म्हणजे राष्ट्रध्वजाशी वैयक्तिक बंध निर्माण करणे तसेच देशभक्तीची भावना वाढवणं हा आहे. या मोहीमेच्या पार्श्वभूमीवर मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या वतीने भव्य बाईक रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. मनपा आयुक्त तथा प्रशासक श्री. राधाबिनोद अ. शर्मा (भा. प्र. से.) यांच्या मार्गदर्शनाखाली ही रॅली प्रभाग समिती क्र. ०५ मधील मिरारोड स्टेशनपासून रसाज मार्गे प्रभाग क्रमांक ०५ कार्यालयापर्यंत पार पडली.

भर पावसात पार पडलेल्या या रॅलीमध्ये सुमारे २०० नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. भारत माता की जय, वंदे मातरम् यांच्या जयघोषांनी संपूर्ण परिसर राष्ट्रभक्तीच्या स्फूर्तीने भरून गेला होता. हातात तिरंगा झेंडा,बाईकची शिस्तबद्ध मिरवणूक आणि नागरिकांचा उत्साहाने वातावरण भारावून गेले होते. महानगरपालिकेचे अधिकारी, कर्मचारी, आणि विविध स्तरांतील नागरिकांनी या रॅलीमध्ये सहभाग घेत राष्ट्रीय एकात्मतेचे दर्शन घडवले. बाईक रॅलीतून स्वच्छ सुंदर मिरा भाईंदर तसेच पर्यावरणपूरक गणेश उत्सव आणि देशभक्तीचा संदेश देत मनपाने एक आदर्श निर्माण केला.

या रॅलीमध्ये सहा. आयुक्त जितेंद्र कांबळे, स्वच्छता निरीक्षक अनिल राठोड, कांतीलाल बांगर, श्याम चौगुले, विनोद जयमाडे, इतर मनपा अधिकारी / कर्मचारी व शहरातील नागरीक उपस्थित होते.